● रविवार, दि २९ सप्टेंबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ६८ वा ● किमंत २ रुपये ● पाने ४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886




https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## वडीलधाऱ्यांच्या आयुष्यात आनंद, समाधानाचे क्षण आणण्यासाठी मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना - मुख्यमंत्री शिंदे

‘मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजने’चा कोल्हापुरातून ई - शुभारंभ; ८०० तीर्थयात्री विशेष रेल्वेने मार्गस्थ





**कोल्हापूर । प्रतिनिधी -** आपली वडीलधारी मंडळी ही आपली संपत्ती असून आजवर त्यांनी कष्ट उपसले आहेत. त्यांचे अनुभव, ज्ञान ही आपल्यासाठी मोठी शिदोरी आहे. त्यामुळं त्यांच्या आयुष्यात आनंद, समाधानाचे क्षण आणण्याची जबाबदारी आपलीच आहे. याच भावनेतून आपण राज्यातील सर्व धर्मियांतील ६० वर्षांवरील ज्येष्ठांसाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत ‘मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना’ सुरु केल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ई-संदेशाद्वारे सांगितले. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते ‘मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजने’चा राज्यस्तरीय ई- शुभारंभ पार पडला.

यावेळी कोल्हापूर येथे वैद्यकीय शिक्षण व विशेष सहाय्य मंत्री तथा पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी हिरवा झेंडा दाखवून विशेष रेल गाडी रवाना झाली. ८०० तीर्थयात्री दर्शनासाठी विशेष गाडीने मार्गस्थ झाले. यावेळी खासदार धैर्यशील माने उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. शिंदे शुभेच्छा संदेशाद्वारे म्हणाले की, या योजनेचा शुभारंभ दक्षिण काशी आई अंबाबाईच्या करवीर येथून होत असल्याचा मनापासून आनंद होत आहे. त्यांनी आई अंबाबाईच्या चरणी नतमस्तक होऊन सामाजिक क्रांतिचे प्रणेते राजर्षी शाहू महाराजांनाही विनम्र अभिवादन केले. मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनेतील पहिली विशेष गाडी आयोध्येसाठी रवाना होते आहे. प्रभू श्री रामांचे दर्शन घेण्याचं संधी या यात्रेच्या शुभारंभाच्या निमित्ताने यात्रेकरूंना मिळतेय, त्यामुळे दक्षिण काशी कोल्हापूर ते प्रभू श्री रामांची जन्मभूमी आयोध्या या तीर्थयात्रेत सहभागी होणाऱ्या पान ३ वर

प्रभारी जिल्हा क्रीडा अधिकारी गाढवे यांनी स्वीकारला पदभार

## ... जनतेचा दृष्टिकोन बदलण्याची ग्वाही



**जालना । प्रतिनिधी** - प्रभारी जिल्हा क्रीडा अधिकारी म्हणून संजय गाढवे यांनी शुक्रवार (दि. २७) रोजी पदभार स्वीकारला. क्रीडा क्षेत्रातील मरगळ दूर करून जिल्हा क्रीडाधिकारी कार्यालयाकडे बघण्याचा जनतेचा दृष्टिकोन बदलण्यासह खेळाडूंना आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देण्यास प्राधान्य राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली.

अरविंद विद्यागर यांच्याकडून प्रभारी जिल्हा क्रीडा अधिकारी पदाचा पदभार संजय गाढवे यांनी स्वीकारला. यावेळी स्टाफसह विविध क्रीडा संघटनांच्यावतीने त्यांचे स्वागत करण्यात आले. याप्रसंगी जिल्हा तायक्वांदो असोसिएशनचे अध्यक्ष अरविंद देशमुख, अशोक पडूळ, शेख इस्माईल यांनीही शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्यात केला. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी जिल्हा क्रीडाधिकारी पान ३ वर

## जल जीवन मिशन योजनेचे काम निकृष्ट दर्जाचे

कॉंग्रेस पदाधिकाऱ्यांचे निवेदन



**जाफराबाद । प्रतिनिधी -** तालुक्यातील देवळेगव्हाण येथे सुरु असलेले जल जीवन मिशन योजनेचे काम है अत्यंत निकृष्ट दर्जाचे असुन सबंधित योजनेची विहीर नियोजित जागेवर खोदली नाही. तिची खोली जमीनी पासुन ६०फ ूट आवश्यक होती. मात्र, ती ४० फुटच खोदली आहे.

विहीरीचे बांधकाम कच्चे मुरूम वापरुन केले आहे. विहीर आणी जलकुंभाचे अंतर सरळ कमी असताना दिड दोन पटीने पाईप वापरले आहे. त्यामुळे पाईपलाईन ला बेन्ड तयार झाले आहे. त्यामुळे जल कुंभात पाणी येणे अवघड आहे. गावातील पाईपलाईनची खोली खुप कमी केली आहे. त्यामुळे पाईप फुटण्याची शक्यता आहे. ३ इंची पाईपची आवश्यकता असताना २.५ इंची टाकली आहे. जलकुंभासाठी कमी जाडीचे लोखंड वापरले आहे. उच्चदाबाच्या लाईनचा सर्वे असतांना लाईनचे तार ओढले असून ऑनलाईला मध्ये ६२८ कनेक्शन दाखवले आहे. प्रत्यक्ष पाहणी केल्यास केवळ २०० कनेक्शन मिळतील. कनेक्शन पाईपलाईन टुबजल जीवन मिशन योजनेअंतर्गत मौजे देळेगव्हाण तालुका जाफराबाद जिल्हा जालना येथील निकृष्ट दर्जेचे झालेल्या कामाची चौकशी करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे. याबाबत ग्रामीण पाणीपुरवठा विभाग जालना जिल्हा परीषद व जिल्हाधिकारी जालना यांना निवेदन देण्यात आले आहे. निवेदन देतांना कॉंग्रसचे युवा नेते इंद्रजित देशमुख, तालुका उपाध्यक्ष अजय बनकर, तुळशीराम गाढवे, परमेश्वर बनकर, संजय बनकर, शंकर कापसे आदींची उपस्थिती होती.

## शासनाच्या बेटी बचाव बेटी पढाव संकल्पनेला काळीमा फासली

अंबड शहरात पंचायत समिती परिसरात ‘स्त्री’ जातीचे अर्भक मृत अवस्थेत आढळले

**अंबड । प्रतिनिधी -** अंबड शहरातील जालना - बीड रोडवरील पंचायत समिती परिसरात एका नवजात स्त्री जातीचे मृत अर्भक आढळून आले आहे. मात्र संबंधित अर्भक हे कोणाचे आहे व कोणत्या रुग्णालयात संबंधित गर्भपात करण्यात आला आहे. हे मात्र अद्याप कळलेले नाही. यामुळे 'शासनाच्या बेटी बचाव बेटी पढाव' या संकल्पनेला अंबड येथे काळिमा फासल्याचे या घटनेवरून दिसून येत आहे.

अंबड पोलिसांकडून याबाबत मिळालेली माहिती अशी की, अंबड पंचायत समिती परिसरात एक बेवारस नवजात बालक हे मृत अवस्थेत आढळल्याने त्या बालकाचा पोस्टमार्टम तसेच डीएनए टेस्ट साठी बालकाचे संपल घेण्यात आले आहेत.

गेल्या काही महिन्या पूर्वी भोकरदन येथे गर्भनिदान तसेच गर्भपात करणाऱ्या टोळीवर कार्यवाही करण्यात आली होती. तरी देखील अजूनही गरज नसणारे निरापराध बालकाला जगात येण्याआधीच गर्भपात करण्यात येऊन त्या अर्भकाला संपविण्यात येत आहे.

अंबड शहरात देखील असा गर्भपात करण्याचा गोरख धंदा काही डॉक्टर पैशाच्या लालसेपोटी करत असतील का? असा प्रश्न या घटनेवरून उपस्थित होत आहे. सोनोग्राफी तसेच गर्भपातावर शासनाची बंदी असतांनाही आज नकोशी पान ३ वर

## पोस्ट पार्सलद्वारे आलेल्या तीन तलवारी जप्त

स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई



**जालना । प्रतिनिधी -** अवैध शस्त्रे बाळगणाऱ्या आरोपीतांची माहिती घेऊन शोध घेत असतांना खबऱ्यामार्फत मिळालेल्या माहितीवरून आरपी रोड वरील एका घरातून तीन तलवारी जप्त करण्यात आल्या आहे. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने शनिवार (दि २८) रोजी केली आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, अवैध शस्त्रे बाळगणाऱ्या आरोपीतांची माहिती घेऊन त्यांचा शोध घेण्यासाठी विशेष मोहिम राबण्यासंदर्भात वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी पान ३ वर

## जनावरांच्या हाडांची वाहतूक करणाऱ्या वाहनावर कारवाई



**जालना । प्रतिनिधी -** शहरातील अंबड चौफुली परिसरात पोलीसांनी शनिवार (दि.२८) रोजी सकाळी पावणे आठ वाजता संशयितरित्या आढळून आलेल्या एका वाहनावर कारवाई करून वाहनासह दोन आरोपी ताब्यात घेतले असल्याची माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांनी माध्यमांशी पान ३ वर

रिक्षा चालकांवर नियंत्रण ठेवण्याची ‘सुराज्य अभियान’ची परिवहन खात्याकडे मागणी !

## वारकऱ्यांची पंढरपुरात अतिरिक्त भाडे आकारत रिक्षा चालकांकडुन लूट

**पंढरपुर । प्रतिनिधी -** महाराष्ट्रासह विविध राज्यांतून प्रतिदिनी २५ ते ३० हजार वारकरी, तसेच अन्य भाविक श्रीक्षेत्र पंढरपूर येथे श्री विठुमाऊलींच्या दर्शनाठी येतात. वारीच्या कालावधीत ही संख्या काही लाखोंच्या घरात असते. यातील बहुतांश भाविक हे एस.टी. बस आणि रेल्वे द्वारे येतात. पंढरपुरात शहरी बस वाहतूक नसल्यामुळे बसस्थानक आणि रेल्वे स्थानकावरून श्रीविठ्ठलाच्या दर्शनाला येण्या-जाण्यासाठी ‘रिक्शा’ हाच एकमात्र पर्याय भाविकांपुढे आहे. यासाठी रिक्शा मीटरनुसार बसस्थानकावरून ३० रुपये, तर रेल्वे स्थानकावरून ५० रुपये भाडे आकारणे आवश्यक असतांना अनुक्रमे १५० ते २०० रुपये भाडे आकारून वारकर्यांची लुटमार केली जात आहे. सर्वसामान्य वारकर्यांची उघडपणे होत असलेली ही आर्थिक लुट रोखण्यासाठी राज्य प्रादेशिक परिवहन विभागाने कारवाई करणे अपेक्षित आहे. या गंभीर प्रकाराकडे लक्ष घालून पंढरपूरसह अन्य तीर्थक्षेत्री होणार्या भाविकांची आर्थिक लुटमारी रोखण्यासाठी तातडीने उपाययोजना काढावी, अशी मागणी सोलापूर हिंदु



जनजागृती समितीच्या ‘सुराज्य अभियाना’चे सोलापूर जिल्हा समन्वयक श्री. दतात्रेय पिसे यांनी ‘सोलापूर सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय पान ३ वर

## तरुणांनी शहीद भगतसिंग यांचे विचार आत्मसात करण्याची गरज - खोतकर



**जालना । प्रतिनिधी -** देशाला आज क्रांतिकारक शहीद भगतसिंग यांच्या विचारांची खरी गरज आहे. तरुणांनी देशातील थोर स्वतंत्र सैनिकांचा इतिहास आत्मसात केल्यास देशभक्ती निर्माण होण्यासाठी फार मोठी मदत होईल असे प्रतिपादन माजी राज्यमंत्री अर्जून खोतकर यांनी केले.

क्रांतिकारक शहीद भगतसिंग यांची शनिवार रोजी जयंती दिनानिमित्त सिगलीकर समाज यांच्या वतीने छ. संभाजी उद्यान (मोतीबाग)येथील आयोजित कार्यक्रमात श्री.खोतकर हे बोलत पान ३ वर

# संपादकीय

## श्रीलंकेत सत्तांतर ; भारतासाठी डोकेदुखी!

भारताचा शेजारी देश असलेल्या श्रीलंकेत नुकतेच सत्तांतर झाले असून तिथे डाव्या विचारसरणीचे अनुरा कुमार दिसनायके हे राष्ट्राध्यक्ष बनले आहेत. श्रीलंकेत नुकतीच निवडणूक झाली आणि त्या निवडणुकीत विमुक्त पेरामुना या राजकीय पक्षाला बहुमत मिळाले. श्रीलंकेत याआधी कधीही या पक्षाला बहुमत मिळाले नव्हते यावेळीही या पक्षाला बहुमत मिळेल असे कोणाला वाटले नव्हते कारण विद्यमान राष्ट्राध्यक्ष रानील विक्रमसिंघे आणि माजी राष्ट्राध्यक्ष राजपक्षे गोटाबाया यांच्या पक्षात मुख्य लढत होती आणि या दोन पक्षापैकीच एका पक्षाचा विजय होईल असा कयास व्यक्त केला जात होता मात्र हा कयास फोल ठरवत दीसनायके यांनी करिश्मा करत आपली सत्ता आणली. श्रीलंकेसाठी हे सत्तांतर महत्वाचे ठरणार आहे कारण गेल्या दोन वर्षात श्रीलंकेत अनेक घडामोडी घडल्या. दोन वर्षापूर्वी म्हणजे २०२२ मध्ये श्रीलंकेत जनतेनेच उठाव करून तेंव्हाचे श्रीलंकेचे राष्ट्राध्यक्ष राजपक्षे गोटाबाया यांना देशातून हाकलून लावले होते. राजपक्षे गोटाबाया यांच्या नंतर त्यांची जागा विरोधी पक्षाचे नेते रानिल विक्रमसिंघे यांनी घेतली. या दोघांनी नेहमीच आलटून पालटून श्रीलंकेची सत्ता उपभोगली पण या दोन्ही नेत्यांविषयी जनतेच्या मनात नाराजी होती कदाचित हीच नाराजी श्रीलंकन जनतेने मतपेटीतून व्यक्त करून तिसरा पर्याय निवडला. श्रीलंकन जनतेने निवडलेला हा तिसरा पर्याय भारतासाठी मात्र डोकेदुखी ठरू शकतो कारण दिसनायके यांचा विमुक्त पेरामुना हा पक्ष डावी विचारसरणी मानणारा पक्ष आहे आणि या पक्षाचे चीनशी सौहार्दाचे संबंध आहेत. खुद्द दिसनायके हे चीन समर्थक मानले जातात. त्यांनी अनेकदा चीनची उघडपणे बाजू घेतली आहे आणि भारतासाठी हीच चिंतेची बाब आहे. पाकिस्तान, बांगलादेश आणि नेपाळ ही भारताची शेजारी राष्ट्रे ही या आधीच पाकिस्तानच्या आधीन गेली आहेत त्यात आता श्रीलंकेची भर पडणार आहे. श्रीलंकेची जर चीनशी सलगी वाढली तर हिंद महासागरात भारताच्या वर्चस्वाला धोका पोहचू शकतो. भारत विरोधी कारवाया करण्यासाठी चीन श्रीलंकेचा वापर करू शकतो त्यामुळे भारताने श्रीलंकेबाबत आता अधिक सजग राहावे लागेल. दुसरी गोष्ट म्हणजे दिसनायके यांनी श्रीलंकेतील तमिळ चळवळीला कायम विरोध केला आहे. भारत श्रीलंकेतील तमिळ चळवळीला प्रोत्साहन देत असून तमिळ नागरिकांच्या स्वतंत्र राष्ट्राच्या मागणी मागे भारताचा आरोप असल्याचा आरोप त्यांनी याआधी केलेला आहे. एकंदरीत श्रीलंकेतील सत्तांतर भारतासाठी डोकेदुखी ठरणारे आहे. अर्थात सत्तेवर येताच दिसनायके यांनी भारताशी सलोख्याचे संबंध ठेवण्याचे वक्तव्य केले ही समाधानाची बाब आहे. २०२२ मध्ये श्रीलंकेत जेंव्हा उठाव झाला तेंव्हा भारतानेच त्यांना आर्थिक मदत केल्याचे त्यांनी सांगितले असून त्यांनी त्यासाठी भारताचे आभारही मानले आहे हे जरी खरे असले तरी चीन त्यांना कधी आपल्या फाशात अडकावेल हे सांगता येत नाही.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

### शंकर चव्हाण यांना परळी मतदारसंघात जनतेकडून प्रतिसाद

# 'बदल हवा, आमदार नवा' स्टेटसचा सोशल मिडीयावर धुमाकूळ

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी -** सध्या परळी मतदार संघात चर्चेत असेलेलं युवा नेतृत्व ड. शंकर चव्हाण यांच्या नावाची जोरदार चर्चा सुरु असल्याची पहावयास मिळत आहे. परळी मतदार संघातून निवडणुक लढणार असल्याबाबत सुरु असलेल्या चर्चेनंतर थेट राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खा. शरदचंद्र पवार यांच्या भेटीनंतर या चर्चेला एक वेगळंच वळण लागलं आहे. असे असतांनाच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून आपल्याला तिकीट मिळावे यासाठी ड. शंकर चव्हाण यांनी दिनांक २४ सप्टेंबर २०२४ रोजी खा. शरदचंद्र पवार यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली होती. पक्षाकडून उमेदवारी मिळावी यासाठी सकारात्मक चर्चाही झाल्याचं ड शंकर चव्हाण यांनी माध्यमांशी बोलतांना सांगितलं होतं. खा. शरदचंद्र पवार हे यंदाच्या विधानसभेला नवीन चेहऱ्यांना संधी देतीलच असा आत्मविश्वास ॲड. शंकर चव्हाण यांनी माध्यमांशी बोलतांना व्यक्त केला आहे.



सध्या परळी मतदार संघातील जनतेकडून ड. शंकर चव्हाण यांच्याकडे स्वच्छ प्रतिमेचा माणूस म्हणून सकारात्मकतेनं पाहिलं जात आहे. प्रत्येक कृती व प्रत्येक पाऊल आता परळी मतदार संघाच्या विकासासाठीच असं सकारात्मक धोरण घेऊन ड शंकर चव्हाण यांनी परळी विधानसभा निवडणुक लढण्याचं मिशन हाती घेतलं असल्याचं पहावयास मिळत आहे. विकासाचा निर्धार व विजयाचा सकंल्प केल्याचाही उल्लेख सध्या सोशल मिडीयाच्या माध्यमातून जनतेसमोर ड चव्हाण यांनी मांडला आहे.

महाराष्ट्राच्या राजकारणात पाहिल्यांदाच इतिहास घडणार आहे की, सर्व जातीधर्मातील जनतेला एकत्र घेऊन येणाऱ्या काळात जातीचं विष समाजामध्ये पेरणाऱ्यांना व तेढ निर्माण करणाऱ्यांना निवडणुकीतून पराजय स्विकारावा लागेल असा ठाम विश्वास ड. शंकर चव्हाण यांनी माध्यमांशी बोलतांना व्यक्त केला. यंदाची विधानसभा निवडणुक ही फक्त आणि फक्त विकासाच्या मुद्यांवरच होईल व निवडुण आल्यानंतरही इतरांप्रमाणे गुत्तेदार न पोसता व स्वतःची घरं न भरता फक्त आणि फक्त विकासकामांनाच माझ्याकडे थारा असेल असंही मत ड. शंकर चव्हाण यांनी व्यक्त केलं आहे.

परळी मतदारसंघात अठरापगड जाती धर्माचे लोक आहेत, ही निवडणुक सर्वांना सोबत घेऊन कसल्याही प्रकारचा जातीवाद न करता, कोणताही पक्षपात न करता संबंध महाराष्ट्रात एकहाती सत्ता आणून अखंड महाराष्ट्राचा चेहरा मोहरा बदलून टाकणार असल्याबाबतही माझं धोरण पुढील काळात असणार आहे असंही परखड मत माध्यमांशी बोलतांना ड. शंकर चव्हाण यांनी केलं आहे.

सध्या सोशल मिडीयावर व्हारल होत असलेल्या ड. शंकर चव्हाण यांच्या पोस्ट जोरदार चर्चेत आहेत. बदल हवा, चेहरा नवा, स्वच्छ प्रतिमेचा, माणूस कामाचा, सर्वसामान्यांच्या हक्काचा, नव्या पर्वाचा नवा शिलेदार, अबकी बार नया आमदार अशा विविध प्रकारच्या पोस्ट परळी मतदार संघातील जनतेच्या सोशल मिडीयावर स्टेस्टला पहावयास मिळत आहेत. इतकंच नव्हे तर तरुण वर्गातून ड. शंकर चव्हाण यांना परळी मतदारसंघात जनतेचा फुल सपोर्ट व 'बदल हवा, आमदार नवा' अशा स्टेटसचा तर सोशल मिडीयावर धुमाकूळ घातला आहे. सकारात्मक विचार व विकासात्मक धोरण असणारे ड. शंकर चव्हाण यांच्यासारखेच लोकप्रतिनिधी म्हणून परळी मतदारसंघाचा विकास करण्यासाठी सक्षमपणे असायला पाहिजेत आहे सुर परळी मतदार संघातील जनतेकडून ऐकायला मिळत आहे. यावरुन माझे विकाकामांबाबत मुद्दे स्पष्ट आहेत व जनता ही केव्हाही सत्याच्या बाजूने भक्कम उभी राहते त्यामुळे परळी विधानसभा मतदार संघाचा पुढचा आमदार मीच असणार आहे असा आत्मविश्वास ॲड. शंकर चव्हाण यांनी व्यक्त केला आहे.

**परळी विधानसभा मतदार संघाचा पुढचा आमदार मीच; ॲड. चव्हाण यांना विश्वास**

महाराष्ट्राच्या राजकारणात पाहिल्यांदाच इतिहास घडणार आहे की, सर्व जातीधर्मातील जनतेला एकत्र घेऊन येणाऱ्या काळात जातीचं विष समाजामध्ये पेरणाऱ्यांना व तेढ निर्माण करणाऱ्यांना निवडणुकीतून पराजय स्विकारावा लागेल . परळी मतदार संघातून विधानसभेची निवडणुक मी सर्व ताकदीने लढणार आहे, सकरात्मक दृष्टीकोण ठेवून फक्त आणि फक्त विकासकामांबाबतच्या मुद्यांवरच ही निवडणुक लढली जाणार आहे. परळीला स्मार्ट सिटी व मतदार संघातील गावांना स्मार्ट विलेज करण्याचं माझं येणाऱ्या काळात मिशन असणार आहे, परळी शहराला आयटी हब व तरुणांना मोठया प्रमाणात रोजगाराच्या संधी मी उपलब्ध करुण देण्यासाठी याबाबत सदैव तत्पर असणार आहे, शिवाय शेतीमालाला योग्य हमीभाव मिळवून देणार व शेतकऱ्यांना हमीभावासाठी यापुढे कधीही रस्त्यावर उतरुन आंदोलन करण्याची गरज भासणार नाही. इतरांप्रमाणे गुत्तेदार न पोसता व स्वतःची घरं न भरता फक्त आणि फक्त विकासकामांनाच माझ्याकडे थारा असेल. यावेळी कोणाचंही मत मी अजिबात वाया जाऊ देणार नाही याची गॅरंटी देतो.

## 'सारथी'च्या विभागीय कार्यालयासह २२५ कोटींच्या विविध विकासकामांचे मुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते भूमिपूजन

### अभ्यासिका, वसतिगृह व वनभवन आदींचा समावेश

**नाशिक । प्रतिनिधी -** नाशिक येथे छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) च्या १५६ कोटी रूपये खर्चून बांधण्यात येणाऱ्या विभागीय कार्यालय, अभ्यासिका, ५०० मुलांचे व ५०० मुलींच्या वसतिगृह इमारतींचे तसेच ४३ कोटी रूपये खर्चून बांधण्यात येणाऱ्या धनगर समाजातील १०० विद्यार्थी व १०० विद्यार्थीनीसाठी वसतिगृह व कार्यालय इमारत आणि २५ कोटी रूपये खर्चून बांधण्यात येणाऱ्या वनभवन इमारतीचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री तथा नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री दादाजी भुसे व मान्यवरांच्या हस्ते कोनशिला अनावरण करून भुमिपूजन झाले. भुमिपूजन समारंभ कार्यक्रमास आमदार प्रा. देवयानी फरांदे, सीमा हिरे, ड. राहुल ढिकले, माजी मंत्री महादेव जानकर, माजी खासदार हेमंत गोडसे, सकल मराठा समाज व सकल धनगर समाजातील मान्यवर आदी उपस्थित होते.यावेळी सकल मराठा समाज बांधव आणि सकल धनगर समाज बांधव यांच्या हस्ते मुख्यमंत्री श्री. शिंदे, उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांचा सत्कार करण्यात आला. आमदार प्रा. देवयानी फरांदे यांनी केलेल्या विविध विकास कामांवर आधारीत विकास पर्व या पुस्तिकेचे अनावरण करण्यात आले.



## कृषी पुरस्कारांचे उद्या राज्यपालांच्या हस्ते वितरण - कृषीमंत्री धनंजय मुंडे

**मुंबई -** कृषी विभागामार्फत कृषी, फलोत्पादन आणि संलग्न क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकरी, व्यक्ती, संस्था तसेच अधिकारी व कर्मचारी यांचा कृषी पुरस्कार प्रदान करून गौरव करण्यात येणार आहे. रविवार (२९) रोजी सायं. ५ वा. मुंबई येथील नॅशनल स्पोर्ट्स क्लब ऑफ इंडिया (डोम) वरळी येथे आयोजित केल्याची माहिती कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी दिली आहे. कोविड तसेच विविध कारणांमुळे प्रलंबित असलेले राज्यातील सन २०२०, २०२१ व २०२२ या तीन वर्षातील एकूण ४४८ पुरस्कार राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांच्या हस्ते, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, कृषी मंत्री धनंजय मुंडे, रोजगार हमी मंत्री दादाजी भुसे, मुंबईचे पालकमंत्री व शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. या कार्यक्रमामध्ये डॉ. पंजाबराव देशमुख कृषी रत्न पुरस्कार (१), वसंतराव नाईक कृषीभूषण पुरस्कार (८), जिजामाता कृषी भूषण पुरस्कार(८), कृषी भूषण (सेंद्रिय शेती) पुरस्कार(८), वसंतराव नाईक शेती मित्र पुरस्कार (८), उद्यान पंडित पुरस्कार(८), वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार (४०), पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी सेवा रत्न पुरस्कार(१०), युवा शेतकरी पुरस्कार(८), अन्नधान्य, कडधान्य व गळीत धान्य पिकांच्या राज्यांतर्गत पीक स्पर्धा योजनेतील पुरस्कार वितरित करण्यात येणार आहेत.

# नको चिंता उपचाराच्या खर्चाची.. मदत आहे शासनाची..!

राज्य शासनाने जनसामान्यांचे आरोग्य जपण्याला प्रथम प्राधान्य दिले आहे. राज्यातील आरोग्य यंत्रणा सक्षम करण्यासाठी विविध निर्णय घेण्यात आले आहे. या निर्णयांमध्ये उपचाराचा खर्च न पेलणाऱ्या नागरिकांना केंद्रीभूत केले आहे. यामुळे जनसामान्यांना दिलासा मिळाला आहे. याशिवाय नियमित आरोग्य तपासणी करण्याचा महत्वाकांक्षी कार्यक्रम राबविला आहे. समाजातील प्रत्येक घटकाची आरोग्य तपासणी करण्यासाठी अभियान शासन राबवित आहे. राज्याची महत्त्वाची योजना असलेल्या 'महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्याचे' प्रति कुटुंब वार्षिक मर्यादा वाढविण्यात आली आहे. या निर्णयांमुळे आज कुठलाही मोठा आजार झाल्यास उपचार करण्याची चिंता नाही.

महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेचे विमा संरक्षण दीड लाखांहून ५ लाख रूपये करण्यात आले आहे. सर्वसामान्यांना खासगी दवाखान्यातील लाख रुपयांची बिले अदा करण्यापेक्षा योजनेच्या माध्यमातून पाच लाख रुपयांपर्यंत उपचार मिळत आहे. तालुका स्तरावरील रूग्णालयेही आता या योजनेचा लाभ रूग्णांना देत आहेत. महात्मा जोतिराव फुले जनआरोग्य योजना व आयुष्यमान भारत, प्रधानमंत्री जनआरोग्य योजना या एकत्रित योजनेतंर्गत लाखो रूग्णांवर शस्त्रक्रिया मोफत करण्यात आल्या आहेत. कर्नाटक सीमा भागात ८६५ गावांमध्ये मराठी भाषिकांना ही योजना लागू करण्यात आली आहे. या भागातील गरजू रूग्णांना योजनेच्या माध्यमातून लाभ देण्यात येत आहे. तसेच मूत्रपिंड प्रत्यारोपण शस्त्रक्रिया याचा लाभही अडीच लाखांवरून चार लाखांपर्यंत नेण्यात आला आहे. त्यामुळे यासंदर्भात जे कोणी लाभ घेऊ इच्छित असतील किंवा जे प्रतीक्षेत आहेत, त्यांना या योजनेचा लाभ होत आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाने प्रत्येक घरात 'माता सुरक्षित - तर घर सुरक्षित' ही अभिनव मोहिम राबविली. या मोहिमेदरम्यान महिलांना तपासणीसाठी नेण्याकरिता तसेच औषधांसाठी प्रति जिल्हा २ कोटी रूपयांचा निधी देण्यात आला. या मोहिमेतून दुर्धर आजारांचे निदान झालेल्या महिलांना उपचारासाठी मदत करण्यात आली. वैद्यकीय अधिकारी आणि स्त्रीरोगतज्ज्ञामार्फत तपासणी, औषधोपचार, सोनोग्राफी आणि समुपदेशन करण्यासाठी मेडिकल, डेंटल शिबिरे आयोजित करण्यात आली. विविध आजाराशी संबंधित तज्ज्ञांचेदेखील सहकार्य घेण्यात आले.

आशा, अंगणवाडी सेविका, आरोग्य सेविका, सेवक यांच्यामार्फत घरोघरी जाऊन उपलब्ध सुविधेबाबत माहिती देण्यात येतो. महिलांमधील कर्करोग, मधुमेह, उच्च रक्तदाब, मोतीबिंदू, कान नाक घसा व इतर आजारांचे निदान व आवश्यकतेनुसार उपचार व समुपदेशन करण्यात आले. राज्यात ४ कोटी ३९ लाख २४ हजार १०० महिलांची आरोग्य तपासणी तसेच दुसऱ्या टप्प्यात ३ लाख १३ हजार ९६५ गर्भवती मातांवर उपचार करण्यात आले आहेत.

राज्यभरात ० ते १८ वर्षांपर्यंतची बालके, किशोरवयीन मुला-मुलींच्या सर्वांगीण आरोग्य तपासणीसाठी 'जागरूक पालक, सुदृढ बालक' हे अभियान राज्यभर राबविण्यात आले आहे. या अभियानांतर्गत राज्यातील सुमारे १८०० शाळांमधील १८ वर्षांखालील जवळपास २ कोटी ४९ लाख ५४ हजार २५७ मुलांची आरोग्य तपासणी करण्यात आली आहे. राज्यात ९ हजार तपासणी पथकांमार्फत ही अभिनव योजना राबविली आहे.

मुला-मुलींच्या सर्वांगीण आरोग्य तपासणीसाठी सार्वजनिक आरोग्य विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग, एकात्मिक बाल विकास विभाग, आदिवासी विभाग व समाजकल्याण विभाग यांच्या समन्वयाने हे अभियान राज्यभर राबविण्यात आले. ही तपासणी शासकीय निमशासकीय शाळा व कनिष्ठ महाविद्यालये, खाजगी शाळा, आश्रमशाळा, अंध शाळा, दिव्यांग शाळा, अंगणवाडया, खाजगी नर्सरी, बालवाड्या, बालगृहे, बालसुधार गृहे, अनाथ आश्रम, समाज कल्याण व आदिवासी विभाग वसतीगृहे या ठिकाणी करण्यात आली. महिला, बालकांसोबतच पुरूषांचीसुद्धा सर्वांगीण आरोग्य तपासणी करण्यात आली. यासाठी 'निरोगी आरोग्य तरुणाईचे, वैभव महाराष्ट्राचे' ही मोहिम राबविण्यात आली. या अभियानांतर्गत १८ वर्षांवरील सुमारे ३ कोटीपेक्षा अधिक पुरुषांची आरोग्य तपासणी करण्यात आली आहे.

या विभागाचा जनमानसात लोकप्रिय आणि कल्याणकारी निर्णय म्हणजे 'हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' होय. या निर्णयामुळे आरोग्य सुविधांचे जाळे अधिक बळकट झाले. सामान्य नागरिकांना अगदी सहज आरोग्य सुविधा मिळू लागल्या. गल्ली बोळात हे दवाखाने सुरू झाल्यामुळे हाकेच्या अंतरावर आरोग्य सुविधांची उपलब्धता झाली. सुरूवातीला मुंबई शहरात सुरू केलेल्या दवाखान्यांना वाढता प्रतिसाद बघता राज्यभरात दवाखाने सुरू करण्यात आले असून राज्यात ३४७ 'आपला दवाखाना' सुरु आहेत.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिनस्थ असलेल्या सर्व रुग्णालयांमध्ये रुग्णांना देण्यात येणाऱ्या सर्व प्रकारच्या वैद्यकीय सेवा निःशुल्क उपलब्ध करून देण्यात येत आहे. या निर्णयाची अंमलबजावणी १५ ऑगस्ट २०२३ पासून करण्यात आली आहे. या निर्णयामुळे रूग्णालयांमधील बाह्य रूग्ण विभागातील रूग्णांची नोंदणी दुपटीने, तर काही ठिकाणी तिपटीने वाढली आहे.

हृदयरोग रुग्णांसाठी राज्यामध्ये सर्व सुविधांची उपलब्धता शासकीय रूग्णालयांमध्ये करण्यात येत आहे. हृदय रोगींसाठी राज्यात १२ ठिकाणी कॅथलॅबची सुविधा देण्यात आली आहे. ही सुविधा आता संपूर्ण जिल्ह्याच्या ठिकाणी उपलब्ध करून देण्याचा शासनाचा मानस आहे. तसेच १७ ठिकाणी एमआरआयची सुविधादेखील उपलब्ध करून देण्यात आली आहे.

राज्यात जालना, भिवंडी, पुणे आणि नागपूर येथे मानसिक आरोग्य व नवीन व्यसनमुक्ती केंद्रे निर्मितीची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. ठाणे व कोल्हापूर जिल्ह्यातील उदेगांव येथे अत्याधुनिक प्रादेशिक मनोरुग्णालय उभारण्यात येणार आहे. हे रूग्णालय 'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मेंटल हेल्थ अँड न्युरोसायन्सेस' च्या धर्तीवर अत्याधुनिक मनोरुग्णालय असणार आहे. यामध्ये अत्याधुनिक शस्त्रक्रिया गृह, अतिदक्षता विभाग, संशोधन विभाग, प्रशिक्षण विभाग, क्रीडा विभाग, योगा व मनन चिंतन या सेवांचा समावेश असणार आहे.

वृद्धांना मोतीबिंदूची समस्या मोठ्या प्रमाणावर येते. राज्य शासनाने 'मोतिबिंदूमुक्त महाराष्ट्र अभियान' राबविले. या अभियानातून मोतिबिंदूमुक्त महाराष्ट्राचे स्वप्न साकार करण्यात येत आहे. या अभियानाच्या माध्यमातून सध्या लाखांच्यावर शस्त्रक्रीया करण्यात आल्या आहेत.

सध्या विविध कर्करोगांचे प्रमाण वाढले आहे. यामध्ये स्तन, गर्भपिशवीच्या मुखाचा, मुख कर्करोगाचे प्रमाण लक्षणीय आहे. कर्करोगावरील उपचार खूप खर्चिक आहे. शासनाने कर्करोग रूग्णांना उपचार सुलभ व्हावे, यासाठी ३४ जिल्ह्यांमध्ये जिल्हा रूग्णालयात 'केमोथेरपी डे केअर' केंद्राची सुविधा दिली आहे. शासनाच्या सुविधांमुळे कर्करूग्णांवर उपचार मिळणे सोयीचे होणार आहे. तसेच कर्करोगाचे निदान लवकर होण्यासाठी ८ मोबाईल कॅन्सर डायग्नोस्टिकची सुविधाही उपलब्ध करून देण्यात येत आहे. कर्करूग्णांच्या शोधासाठी आरोग्य विभागामार्फत नियमितपणे सर्वेक्षणाद्वारे संशयित कर्करोगी शोधले जात आहेत. संशयित रुग्णांसाठी बायोप्सी करणे आवश्यक करण्यात आले आहे.

मुत्रपिंडाच्या आजाराने त्रस्त असलेल्या रूग्णांसाठी २३४ तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयात डायलिसीस सेवा, हिमोफिलीयाग्रस्त रूग्णांसाठी प्रत्येक जिल्हा रूग्णालयात 'हिमोफिलिया डे' केअर केंद्राची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. गर्भधारणापूर्व माता व दोन वर्षापर्यंतच्या बालकांचे आरोग्य सुधारण्यासाठी 'वात्सल्य' ही विशेष योजना राबविण्यात येत आहे. कमी वजनाच्या बालकांच्या जन्माचे प्रमाण आणि जन्मजात व्यंग असलेल्या बालकांचे प्रमाण कमी होण्यास मदत होणार आहे. तसेच माता मृत्यू व बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्याच्या उद्देशाने राज्यातील आदिवासी व दुर्गम भागात माहेरघर योजनेला मुदतवाढ देण्यात आली आहे. राज्यात आधुनिक उपकरणासहित व तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकासह १ हजार ७५६ ॲम्बुलन्स खरेदीचा निर्णयही घेण्यात आला आहे. यामुळे सर्वसामान्य नागरिकांना जलद गतीने उपचार मिळण्यास निश्चितच मदत होणार आहे. राज्यातील प्रत्येक तालुक्यासाठी एक शववाहिका उपलब्ध करून देण्यात येत आहे. सध्या ३६ ठिकाणी उपलब्ध शववाहिका उपलब्ध करून देण्यात आली असून ३५२ ठिकाणी लवकरच ही सेवा देण्यात येणार आहे. अशाप्रकारे राज्य शासनाने जनसामान्यांच्या उपचाराची काळजी घेण्यासाठी विविध निर्णय घेवून त्याची अंमलबजावणी केली आहे.

**- नीलेश तायडे,**
**विभागीय संपर्क अधिकारी**

# दानकुंवर हिंदी कन्या विद्यालयात इंटरॅक्ट क्लब जालना ई-लाईट स्पार्कलची स्थापना



**जालना । प्रतिनिधी -** रोटरी क्लब जालना इलाईट अंतर्गत येथील श्रीमती दानकुंवर हिंदी कन्या विद्यालयात इंटरॅक्ट क्लब जालना ईलाईट स्पार्कलची स्थापना करण्यात आली असून, नूतन पदाधिकारी आणि सदस्यांना सहाय्यक प्रांतपाल पंकज पाटणी यांनी चार्टर प्रेझेंटेशन दिले.

याप्रसंगी श्रीमती दानकुंवर हिंदी कन्या विद्यालयाच्या व्यवस्थापन समितीचे सदस्य निरज महेंद्रकुमार गुप्ता, सागर श्यामसुंदर अग्रवाल, मुख्याध्यापिका श्रीमती गायत्री शुक्ला, श्रीमती मनीषा पांडे, क्लबचे अध्यक्ष राजेंद्र अग्रवाल, सचिव अनया अग्रवाल, उपाध्यक्ष उमेश बजाज, सहसचिव संगीता गादिया , शरद गादिया, गिरीधर लधानी, डॉ. प्रल्हाद उढाण, कैलास शिंदे, प्रदीप भारजवाल यांची प्रमुख उपस्थिती होती. इंटरॅक्ट क्लब जालना ईलाईट स्पार्कलच्या अध्यक्षा अध्यक्ष कु. रोहिणी संतोषसिंग ठाकूर, सचिव कु. सोहा शेख नजीब यांच्यासह सदस्यांना चार्टर प्रेझेंटेशन देण्यात आले. रोटरी ४ वे टेस्टचे वाचन संगीता गादीया यांनी केले.

विद्यालयाचे संस्थापक दिवंगत कुंदनलालजी अग्रवाल यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केल्यानंतर नव्याने स्थापन झालेल्या इंटरॅक्ट क्लब जालना एलिट स्पार्कलचे पदाधिकारी आणि पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. इंटरॅक्ट क्लब जालना ईलाईट स्पार्कलमध्ये ३१ विद्यार्थिनींचा सदस्य म्हणून समावेश करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये स्टेज करेज विकसित व्हावे, बंधुभाव व सेवाभाव वाढीस लागावा, या उद्देशाने १२ ते १८ वयोगटातील विद्यार्थ्यांचा या क्लबमध्ये समावेश करण्यात येतो.

याप्रसंगी सहायक प्रांतपाल पंकज पाटणी , अध्यक्ष राजेंद्र अग्रवाल, सचिव अनया अग्रवाल यांनी क्लब आणि शाळेच्या सदस्यांना इंटरॅक्ट क्लबचे फायदे समजावून सांगितले. इंटरॅक्ट क्लबच्या सदस्यांद्वारे शालेय शैक्षणिक उपक्रमांचे संपूर्ण व्यवस्थापन आणि हाताळणीसाठी शिक्षक दिनी पहिला प्रकल्प घेतल्याबद्दल अध्यक्षांनी कौतुक केले. मुख्याध्यापिका श्रीमती गायत्री शुक्ला यांनी यावेळी मार्गदर्शन केले. शेवटी उपस्थितांचे आभार उपाध्यक्ष उमेश बजाज यांनी मानल `.

## रविवारी जागतिक ज्येष्ठ नागरिक दिवसानिमित्त मेळावा

**जालना -** राज्यात १ ऑक्टोबर हा दिवस जागति क ज्येष्ठ नागरिक दिवस साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानूसार ज्येष्ठ नागरिकांसाठी रविवार दि. १ ऑक्टोबर, २०२४ रोजी सकाळी ११ वाजता जालना येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनातील सभागृहात मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. तरी मेळाव्यास जिल्ह्यातील ज्येष्ठ नागरिक, सामाजिक संघटनांनी उपस्थित रहावे, असे आवाहन समाज कल्याणचे सहायक आयुक्त अनंत कदम यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे. भारताच्या संविधानातील राज्य धोरणाच्या निदेशक तत्वावरील अनुच्छेद ३९ क व ४१ मध्ये ज्येष्ठ नागरिक सुस्थितीत असावा अशी तरतूद आहे. ज्येष्ठ नागरिकांचे समाजातील स्थान विचारात घेता त्यांना वृध्दापकाळ चांगल्या प्रकारे घालविता यावा. तसेच समाजामध्ये त्यांचे जीवन सुसह्य व्हावे, शारिरीक व मानसिक आरोग्य सुस्थितीत रहावे. वृध्दापकाळामध्ये त्यांच्या आर्थिक क्षमता, कामाचा हक्क, शिक्षणाचा हक्क आणि सार्वजनिक मदत मिळविण्यासाठी राज्याच्या सर्वसमावेशक धोरणानूसार १ ऑक्टोबर हा दिवस जागतिक ज्येष्ठ नागरिक दिवस साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. असेही प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# टेंभुर्णी परिसरात वीज पडून दोन बैलांचा मृत्यू

### शेतकरी हवालदिल; लाखांचे नुकसान



टेंभुर्णी । प्रतिनिधी - टेंभुर्णी आणि गणेशपूर ही गट ग्रामपंचायत असून गणेशपुर हा टेंभुर्णीचा एक भाग आहे. गणेशपुर येथील शेतकरी रामकिसन पांडुरंग कावळे यांच्या बैल जोडीवर वीज पडून दुर्दैवी मृत्यू झाला असून ही घटना दुपारच्या साडेतीन वाजेची असून आंबेवाडी शिवारमधील शेतात घडली. त्यांची ही दोन्ही बैल एका ठिकाणी बांधलेले होते. पाऊस थोडा मात्र वीजेचा कडकडाट मोठा होता. घटनेची माहिती तलाठी रमेश धनेश यांना दिल्यानंतर त्यांनी तात्काळ पंचनामा करून वरिष्ठाकडे अहवाल पाठविला आहे. या घटनेमुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. दुर्घटनेत जवळपास एक लाख रुपयांचे नुकसान झाले असल्याचे कळते.

# टेंभुर्णीचा दिव्यांग कवी आकाश देशमुख याची तारक मेहता फेम नितीन देसाई यांनी भेट घेतली

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** येथील दिव्यांग कवी आकाश देशमुख याला नुकताच सेवा गौरव पुरस्कार देण्यात आला. मुंबई येथे झालेल्या या कार्यक्रमांमध्ये आकाश देशमुख याला सन्मानपूर्वक हा गौरव देण्यात आला. एका दिव्यांग कवीची प्रतिभा लक्षात घेऊन तारक मेहता या मालिकेतील हास्यविनोदाचे सिने अभिनेता नितीन देसाई त्यांनी दिव्यांग कवी आकाश देशमुख याची विचारपूस केली. काव्यप्रतिभेच्या त्यांच्याशी संवाद साधला. व दिव्यांग असूनही कवितेची प्रतिभा लक्षात घेऊन ते भारावून गेले. दिव्यांग कवी आकाश देशमुख यांचे आई-वडील भास्करराव देशमुख व शारदा देशमुख यांच्याशी त्यांनी संवाद साधला. आकाश देशमुख च्या प्रतिभा लक्षात घेता त्यांनी संवाद साधताना आकाश देशमुख ला त्याच्या सेवा गौरव पुरस्काराबद्दल शुभेच्छा ही दिल्या. त्याचा गौरव करताना त्यांनी आकाश संवाद साधू आपल्या प्रतिभेचा आपल्या कवितेचा गौरव करतो तसेच तेव्हा गौरव पुरस्काराला आलेले सन्माननीय अतिथी यांनी सुद्धा दिव्यांग कवी आकाश देशमुख यांची विचारपूस करतानाच त्याच्याशी संवाद



साधला प्रतिभावान कवी, त्याची जिद्द, त्यांनी काव्य क्षेत्रामध्ये दिलेले योगदान, दिव्यांगा वर मात करताना, त्याची जिद्द ही प्रश्नी आहे असे सर्वांनीच उद्गार काढले.

### जिल्हास्तरीय शालेय व्हॉलीबॉल व नेटबॉल स्पर्धा

# पार्थ सैनिकी शाळेतील विद्यार्थ्यांची विजयी घौडदौड; १४, १७ आणि १९ तीनही वयोगटात विजेतेपद

**जालना । प्रतिनिधी** - शालेय शिक्षण व क्रीडा विभाग युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय जालना यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित जिल्हास्तरीय हॉलीबॉल स्पर्धेमध्ये आज पार्थ सैनिकी शाळेच्या सतरा वर्षाखालील मुलांच्या संघाने मत्स्योदरी हायस्कूल अंबड संघाचा पराभव करत विभागीय स्पर्धेसाठी पात्र ठरले आहेत. पार्थ सैनिकी शाळेकडून वरद नवले, सार्थक निलक, पृथ्वीराज खरात, हर्षवर्धन नागवे, आदर्श ढाकणे, संकेत चव्हाण, अमोल मुंडे, प्रज्वल उबाळे, कृष्णा मगर, शुभम जंजाळ व पवन शेल्युटे यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. विशेष म्हणजे जिल्हास्तरीय नेटबॉल स्पर्धेत देखील पार्थ सैनिकी शाळेच्या संघांनी १९ वर्षाखालील, १७ वर्षाखालील व १४ वर्षाखालील गटांमध्ये विजेतेपद मिळवीत विभागीय स्पर्धेसाठी पात्र ठरले आहेत. संघाचे मार्गदर्शक श्री. ध्यानसिंग , श्री. योगेश बावस्कर, रोहित गायकवाड, सुभेदार सत्येंद्र सिंग बीस्ट, सुभेदार भैय्यासाहेब ढवळे व सतीश गाभूड यांनी मेहनत घेतली. संस्थेचे अध्यक्ष राजेश टोपे, सचिव मनीषा ताई टोपे, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ.बी. आर. गायकवाड यांच्यासह प्रशासकीय अधिकारी राहुल भालेकर, शाळेचे प्राचार्य मोहन नेहेर, प्राध्यापक वर्ग आदींनी विजय संघाचे कौतुक केले आहे.



## पान १ वरुन

### वडील धाऱ्यांच्या आयुष्यात ...

सर्व ज्येष्ठांचे अभिनंदन व त्यांना शुभेच्छा. यासाठी जिल्हास्तरावर समित्या स्थापन केल्या आहेत. निवड झालेल्या लाभार्थ्यांचा प्रवास, निवास, भोजन खर्च करण्यात येणार आहे. भारतातील ७३ आणि आपल्या राज्यातील ६६ तीर्थक्षेत्रांचा योजनेमध्ये समावेश असून पारदर्शक आणि ऑनलाईन पद्धतीने राबवण्यात येत आहे. कोल्हापूर जिल्ह्यांने या मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनेच्या शुभारंभाचा मान पटकावल्याचे सांगून मंत्री श्री. मुश्रीफ यांचे या शुभारंभाच्या निमित्ताने अभिनंदन केले.

तीर्थयात्रेत सहभागी ज्येष्ठांसाठी रेल्वेत औषधे, वैद्यकीय सुविधाही उपलब्ध करून दिल्या आहेत. जेष्ठ नागरिकांच्या मदतीसाठी सामाजिक न्याय विभागाचे १०, वैद्यकिय मतदतीसाठी ३ तर आयआरसीटीसीचे २४ कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. कोल्हापुरातून सुरु झालेल्या मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनेची आता राज्यभरातील सर्वच जिल्ह्यांमधून अमंलबजावणी सुरु होईल, असा विश्वास मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी व्यक्त केला.

**योजनेतील पहिली रेल्वे कोल्हापुरातून रवाना होत आहे, हे माझे भाग्य - पालकमंत्री श्री. मुश्रीफ**

शासनाकडून मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनेचा शुभारंभ कोल्हापुरातून होतोय याचा आनंद झाल्याचे सांगून पालकमंत्री श्री. मुश्रीफ म्हणाले की, या योजनेतील पहिली रेल्वे कोल्हापुरातून रवाना होत आहे हे माझे भाग्यच आहे. यात्रेकरूंना प्रवासात कोणतीही अडचण येणार नाही याची दक्षता घेतली जात आहे. पहिली रेल्वे आयोध्येला जाताना व त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद पाहताना फार मोठं समाधान होत आहे. श्रीरामांचे दर्शन घडविण्याचा हा फार मोठा क्षण असून आपल्या आई वडिलांप्रमाणे या यात्रा कालावधीत सर्व शासकीय अधिकारी त्यांची सेवा करतील. या योजनेतून आयआरसीटीसी कडून चांगल्या गुणवत्तेचा मोफत चहा, नाष्टा, जेवण दिले जाणार आहे. जिल्यातातून २१६३ अर्ज आले होते, लोकसंख्येच्या प्रमाणात ८०० कोटा प्रथम आला असून यातील पारदर्शकपणे निवड झालेल्या सर्वांचे अभिनंदन त्यांनी केले.

खासदार श्री. माने यांनीही यावेळी सर्व तीर्थकरुंना शुभेच्छा दिल्या. कोल्हापूर जिल्ह्यातील हा क्षण अविस्मरणीय आहे. ज्या लोकांना सहजासहजी श्रीरामांचे दर्शन घेता येणार नाही त्यांच्यासाठी शासनाकडून या योजनेद्वारे चांगली सोय केली आहे. दिमाखदार सोहळ्यातून या योजनेची सुरूवात कोल्हापूर येथून केल्याबद्दल त्यांनी मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री यांचे आभार मानले.

### जनतेचा दृष्टीकोन ...

कार्यालयाचे वरिष्ठ लिपिक श्री. प्रसाद हे उपस्थित होते. यावेळी श्री. गाढवे पुढे म्हणाले की, खेळामुळे आरोग्य सुदृढ बनते. मात्र, आजघडीला युवा पिढी सोशल मीडियात गुरफटली आहे. त्यामुळे क्रीडांगणे ओस पडू लागली आहेत. त्यांना मैदानाकडे आकर्षित करण्यासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या माध्यमातून विशेष प्रयत्न केले जातील. क्रीडांगणाचा विकास करून विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन केले जाईल. खेळाडू आणि जनतेने आमच्याकडे येऊन मोकळेपणाने क्रीडा समस्यासंदर्भात आपले म्हणणे मांडावे, क्रीडा संदर्भात कोणतेही प्रश्न अथवा अडचणी असतील तर आपल्या ७८२१८५२१४४ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा. प्रत्येकाला जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आपलेसे वाटावे, यादृष्टीने वातावरण निर्मिती आणि जनसंवादाला प्राधान्य देऊन या कार्यालयाकडे पाहण्याचा जनतेचा दृष्टिकोन बदलण्यासाठी पुरेपूर प्रयत्न करण्यात येतील, असे त्यांनी सांगितले. अरविंद देशमुख म्हणाले की, संजय गाढवे यांच्याकडून निश्चितच क्रीडा चळवळीला प्रोत्साहन मिळेल, अशी आम्हाला अपेक्षा आहे.

पदभार स्वीकारल्यानंतर संजय गाढवे यांनी जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्णनाथ पांचाळ यांची सदिच्छा भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा केली. संजय गाढवे हे प्रभारी जिल्हा क्रीडा अधिकारी म्हणून जालना येथे रुजू होण्यापूर्वी भोकरदन-जाफराबाद तालुका क्रीडा अधिकारी म्हणून कार्यरत होते. या तालुक्याचा पदभारही त्यांच्याकडे कायम राहणार आहे. श्री. गाढवे हे सन २००१ मध्ये निवड मंडळामार्फत क्रीडा प्रशिक्षक म्हणून रुजू झाले. त्यांना पहिली पोस्टिंग नांदेड येथे मिळाली होती. मुंबई, धुळे, जालना, औरंगाबाद येथेही त्यांनी क्रीडा मार्गदर्शक म्हणून कर्तव्य बजावलेले आहे. नांदेडचे प्रभारी जिल्हा क्रीडा अधिकारी म्हणूनही त्यांनी काम पाहिलेले आहे.

संजय गाढवे यांनी राष्ट्रीय स्तरावरील २० जिम्नॅस्टिक स्पर्धेत सहभाग नोंदवून विविध पारितोषिके पटकावलेली आहेत. त्यांचे शिक्षण एम. ए. बीपीएड झालेले असून, त्यांनी पंजाबमधील पतीयाळा येथील येथील नेताजी सुभाष बोस नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ स्पोर्ट्मध्ये एक वर्ष कालावधीचा डिप्लोमा केलेला आहे. प्रशिक्षण एवढे कठीण असते की, अर्धवट सोडून जावे की काय, असे वाटू लागले होते, असे त्यांनी प्रशिक्षणाचे अनुभव सांगताना विषद केले. क्रीडा चळवळ यापक प्रमाणात रुजविण्यासह तालुका स्तरावरील क्रीडांगण विकासासाठी आपण प्रयत्नशील राहू, अशी ग्वाही दिली.

### शासनाच्या बेटी ...

असणारे स्त्री जातीचे अर्भक पंचायत समिती परिसरात मिळून आल्यामुळे आरोग्य विभागाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.

अंबड येथील पंचायत समिती परिसरात सापडलेल्या स्त्री जातीच्या अर्भकाचे पोस्ट मार्टम करण्यात येऊन डीएनए टेस्ट साठी नमुने घेण्यात आले आहे. पोलिसांच्या वतीने तपास सुरु करण्यात आला असल्याची प्रतिक्रिया पोलीस निरीक्षक सतीश जाधव यांनी दिली आहे.

### पोस्ट पार्सलद्वारे ...

दिलेल्या सूचनेनुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांनी गुन्ह शाखेचे एक पथक निर्माण केले. या पथकाला खबऱ्यामार्फत खात्रीशीर माहिती मिळाली की, राहुल नटवरलाल व्यास रा. आरपी रोड जालना. याने पोस्ट पार्सलद्वारे धारदार तीन तलवारी मागविलेल्या आहेत. याबाबत वरिष्ठांना कळवून पथकातील अधिकाऱ्यांनी हेड पोस्ट ऑफिस मधून माहिती घेतली असता तीन तलवारीचे पार्सल हे आरपी रोड वरील राहुल व्यास यांच्या घरी पाठविले असल्याचे पोलीसांना कळाले. त्यांनतर राहुल व्यास यांच्या घराची झडती त्याच्या घरातून खाकी रंग असलेल्या पुठ्ठ्यायच्या बॉक्समध्ये अंदाजे पाच हजार रु. किंमतीच्या तीन धारदार तलवारी मिळून आल्या. या तीन तलवारी पोलीसांनी जप्त केल्या आहेत. आरोपीविरोधात सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल, अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव, सपोनि श्री. योगेश उबाळे, पोउपनि श्री. राजेंद्र वाघ, पोलीस अंमलदार सॅम्युअल कांबळे, कृष्णा तंगे, रमेश राठोड, लक्ष्मीकांत आडेप, सागर बाविस्कर, देविदास भोजणे, सतिश श्रीवास, सोपान क्षिरसागर, धीरज भोसले आदींनी केली आहे.

### जनावरांच्या हाडांची ...

संवाद साधतांना दिली. सदर वाहनामध्ये प्राण्याची हाडे रचुन ठेवलेली तसेच हाडाला लागलेले मास कुजून त्यात आळ्या पडलेले आयशर वाहन क्र.MH13CU1622 वाहन चालकाने रस्त्याच्या परिस्थीतीकडे दुर्लक्ष करुन हयगयीने धोकादायकरित्या वाहन चालवुन कुजलेले जनावरांची हाडे मानवी जिवितास धोका असलेल्या रोगांचा संभव असलेली घातकी कृती केले म्हणून तालूका जालना पोलीस ठाण्यात पो.हेड का. सदाशिव राठोड यांच्या फिर्यादीवरून आरोपी मोहमंद ताहा इम्तियाज अन्सारी, दिलसार अक्तर अली हाश्मी दोन्ही रा. इदगाह रोड गवळी पाडा भिवंडी यांच्या विरोधात भा.न्या.सं.कलम २७२, २८१ सह १८४ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोहेका कांगणे हे करीत आहेत.

### वारकऱ्यांची पंढरपुरात ...

तिराणकर यांच्याकडे केली. या वेळी सर्वश्री राजेंद्र पलनाटी व किशोर पुकाळे उपस्थित होते.

पंढरपूर बसस्थानक ते श्रीविठ्ठल मंदिरापर्यंतचे अंतर दीड किलोमीटर, तर पंढरपूर रेल्वे स्थानक ते श्रीविठ्ठल मंदिरापर्यंतचे अंतर दोन किलोमीटर आहे. येथे रिक्शा चालक मीटरनुसार भाडे आकारत नाहीत. अनेकदा रिक्शा चालक व्यक्ती नवीन असल्याचे पाहून १५० ते २०० रुपयांपर्यंत भाडे उकळतात. अन्य पर्याय नसल्यामुळे भाविकांना अधिकचे भाडे दिल्यावाचून पर्याय नसतो. रिक्शा चालकांनी योग्य भाडे घेतले, सर्वांचा लाभ होईल, असेही श्री. पिसे यांनी सांगितले.

**'सुराज्य अभियान' ने परिवहन विभागाला सुचवलेल्या उपाययोजना !**

या विषयीचे निवेदन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, परिवहन विभागाचे सचिव, परिवहन आयुक्त, सोलापूरचे जिल्हाधिकारी, यांनाही देण्यात आले आहे. यात सुचवलेल्या उपाययोजनांमध्ये श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर या मार्गावर येण्या-जाण्यासाठीचे रिक्शाभाडे निश्चित करून त्याचे दरफलक रिक्शा स्टॅन्ड आणि मंदिर येथे लावणे, ठरवलेल्या दराहून अधिक भाडे आकारणार्या रिक्शाचालकाच्या विरोधात तक्रार करता यावी यासाठी फलकांवर 'हेल्पलाईन क्रमांक' देणे, परिवहन अधिकार्यांनी अचानक भेट देऊन अधिक दर आकारणार्यांवर दंडात्मक कार्यवाही करणे, भाविकांसाठी विनामूल्य अथवा अल्पदरात वाहन व्यवस्था उपलब्ध करून देणे, तसेच हा विषय केवळ पंढरपूर तीर्थक्षेत्रापुरताच मर्यादित नसून राज्यातील सर्वच तीर्थक्षेत्री असे घडते का, याचा सखोल तपास करून त्यावर योग्य कार्यवाही करावी, अशी मागणी सुराज्य अभियानाच्या वतीने करण्यात आली आहे. लाखो वारकर्यांची होणारी आर्थिक लुटमार थांबवून परिवहन विभागाने विठुमाऊलीचा कृपाआशीर्वाद मिळवावा, असेही आवाहन श्री. पिसे यांनी केले आहे.

### तरुणांनी शहीद भगतसिंग ...

होते. ते पुढे बोलताना म्हणालेकी, देशाच्या क्रांतिकारकांचा गौरवशाली इतिहास सर्व दूर पोहचवण्यासाठी सामजिक संघटनांनी पुढाकार घ्यावा अशी मागणी त्यांनी यावेळी केली पाहिजे. कार्यक्रमाच्या प्रारंभी शहीद भगतसिंग यांच्या प्रतीमेस श्री. खोतकर यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले . कार्यक्रमाच्या प्रस्ताविक संदीप सिंग भादा यांनी करतांना सागितले कि,जालना जिल्ह्यामध्ये शहीद भगतसिंग यांचे स्मारक नाही त्यांचे स्मारक उभारण्यासाठी राज्यकर्त्यांनी पुढाकार घ्यावा याप्रसंगी न.प गट नेते गणेश राऊत, पंडित भुतेकर, बंडू मोहिते, शिवप्रसाद चित्तोळकर, अँड अशपाक पठाण, सिगलिकर समजाचे अध्यक्ष संतोष सिंग कलानी, सय्यद जावेद अली, बाबासाहेब सोनवणे, सतनाम सिंग टाक, गुर्मीत सिंग सेना, अजित सिंग कलानी, गुर्मीत सिंग कलानी, करण सिंग भोंड, तारण सिंग कलानी, जित्तू सिंग टाक, गोपी सिंग कलानी आदि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष सिंग कलानी यांनी केले.

# दलित आदिवासी नेते ॲड. भास्कर मगरे यांचे लाक्षणिक उपोषण

**जालना । प्रतिनिधी -** दलित आदिवासी नेते तथा शिवसेना दलित आघाडीचे जिल्हाप्रमुख ॲड. भास्करराव मगरे यांचे एक दिवशीय लाक्षणिक (लक्षवेधी) उपोषण ३० सप्टेंबर रोजी जालना जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सकाळी १०.३० ते ५.३० वाजेपर्यंत करणार असल्याची माहिती दलित आघाडीचे जिल्हाप्रमुख ॲड. भास्करराव मगरे यांनी दिली आहे. यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांसह मुख्यमंत्र्यांना निवेदन देण्यात आले आहे. दरम्यान या लाक्षणिक उपोषणातून शासनाशी चर्चा घडून आणणार असल्याचेही मगरे यांनी सांगितले.

जालना जिल्ह्यातील दलित आदिवासी भूमिहीन कास्तपट्टे नावे करुन सातबारा देण्यात यावा मागण्यांसह विविध मागण्यांसाठी शिवसेना दलित आघाडीचे जिल्हाप्रमुख ॲड. भास्करराव मगरे यांनी आंदोलने, मोर्चे, जालना ते म ुंबई असे मोर्चे काढलेले आहे. अद्यापही त्यांच्या मागणीकडे शासनाचे लक्ष वेधले नसल्याने शेवटी मगरे यांनी एक दिवशीय लाक्षणिक उपोषण करण्याचा निर्णय घेतला असून यासंदर्भात जिल्हाधिकार्यांसह मुख्यमंत्र्यांना निवेदन दिले आहे.

जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, मराठवाडा विशेषतः जालना जिल्ह्यातील दलित आदिवासी भुमिहिन कास्तपट्ए नावे करुन सातबारा देण्यात यावा, राज्यातील विशेषतः मराठवाड्यातील दलित आदिवासी भुमिहिन कास्तकरांना शासनाने प्रदान केलेल्या गायरान जमीनी सिलींग ॲक्टमधील शेत जमीनी, इनामी जमीनी आदी संगणकीय सातबारा करुन लाभार्थ्यांचे नावासम ोरील क्षेत्र पोट खराबीमध्ये दाखवत असल्याने लाभार्थ्यांना शासकीय मदतीशिवाय बँकेच्या कर्जापासून वंचित राहावे लागत आहे, त्याम ध्ये दुरुस्ती करुन सातबारा क्षेत्र पूर्ववत करण्यात यावे. कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिम ानी योजनेची प्रभावीपणे प्रशासकीय स्तरावर अंम लबजावणी करण्यात यावी, शासनाने घरकुल आवास, रमाई आवास, शबरी घरकुल, पारधी आवास, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनासाठी प्रधानमंत्री आवास योजनेतून सर्वांसाठी घरे-२०२२-२४ नुसार उपेक्षित समाजातील वंचित घटकाला विशेष प्राधान्य देण्यात यावे, निराधार योजनेतून निराधारांना मासिक देय अनुदान दीड हजारांऐवजी तीन हजार रुपये देण्यात यावे. मौजे पाणशेंद्रा ग.नं. ९ एकुण क्षेत्र ४५.७१ हे. जमीनीवर स्थानिक आदिवासी भुमिहिनांचे अतिक्रमण ४० वर्षांपुर्वीचे आहे, काहींना सातबारा वर घेतले आहे काहींची नोंद नाही, न्याय प्रविष्ठ प्रकरणात शासनाने हस्तक्षेप न करता सातबारा देण्यात यावा. मौजे गणेशनगर ग.न. ६९ (गायरान) न्याय प्रविष्ट प्रकरणात स्थानिक आमदारांनी हस्तक्षेप करु नये. जिल्हाधिकारी जालना यांचे २३ जानेवारी २००६ आदेशानुसार मौजे रामनगर (सावरगाव हडप) ता.जि.जालना येथील ग.न. २०० (गायरान) जमीनीवरील लाभार्थी यांचे अतिक्रमण नियमानुकूलित



करुन सातबाराला नोंद घेण्याचे निर्देश देवून तहसिलदार जालना यांनी डिसेंबर २०२३ मध्ये ८ बेकायदेशिर लोकांच सातबारा उतार्यांवरील नावे कमी करण्याचेही निर्दे श देण्यात यावेत, आदी मागण्यांसाठी सोमवार ३० सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लाक्षणिक उपोषण करणार असल्याचे भुमिहिन, कास्तकरांचे नेते ॲड. भास्करराव मगरे यांनी सांगितले.


# १७०० पेक्षा अधिक निराधार लाभार्थ्यांना पेन्शन मंजुर; बचत गटांना ५ कोटींची कर्ज प्रकरणे मंजुर

## आ. बबनराव लोणीकर यांची माहिती

**परतूर । प्रतिनिधी -** माजीमंत्री आमदार बबनराव लोणीकर यांच्या विशेष प्रयत्नातून संजय गांधी निराधार योजने अंतर्गत १७०० पेक्षा अधिक लाभार्थ्यांना पेन्शन मंजूर करण्यात आले आहे. या लाभार्थ्यांमध्ये ६५ वर्षे वयापेक्षा अधिक वय असणारे वयोवृद्ध, निराधार, विधवा, दिव्यांग, परित्यक्ता, दुर्धर आजारग्रस्त यांचा समावेश असून श्रावण बाळ, संजय गांधी निराधार, इंदिरा गांधी वृद्धापकाळ निवृत्तीवेतन यासह विविध योजनांचा समावेश आहे असेही प्रसिद्धीस दिलेले पत्रकात म्हटले आहे.

महिला व बालकल्याण विभाग अंतर्गत बालसंगोपन योजनेअंतर्गत परतुर मंठा व जालना तालुक्यातील ६०० पेक्षा अधिक अनाथ बालकांना ज्यांना आई किंवा वडील नाही किंवा दोन्हीही नाही अशा अनाथ बालकांना त्यांचा शैक्षणिक खर्च व उपजीविका भागवण्यासाठी प्रति महिना २२०० रू उपलब्ध करून देण्यात आला आहे त्यासाठी गटशिक्षणाधिकारी अंगणवाडी कार्यकर्ता अंगणवाडी मदतनीस यांच्यासह लोकप्रतिनिधी पक्ष पदाधिकाऱ्यांनी खूप मोठी मदत केली असल्याचे देखील लोणीकरांनी प्रसिद्धीस दिलेले पत्रकात म्हटले आहे.

महिला सक्षमीकरणाचे धोरण डोळ्यासमोर ठेवून पंतप्रधान नरेंद्र मोदी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या म ाध्यमातून आपण स्वतः या महिला बचत गटांना सक्षम बनवण्यासाठी सातत्याने प्रयत्न केलेले आहेत त्याचाच एक भाग म्हणून महिला बचत गटांना कर्ज प्रकरणे मंजूर करून सक्षम बनवण्याचा सातत्याने प्रयत्न करत आलो आहे यावर्षी देखील परतूर मंठा व जालना तालुक्यातील शेकडो बचत गटांना ५ कोटी रुपयांपेक्षा अधिक कर्ज मंजूर करण्यात आले असून १ ऑक्टोबर रोजी परतुर व मंठा येथे आयोजित कार्यक्रम ादरम्यान धनादेशाचे वाटप करण्यात येणार आहे.



या धनादेश वाटपामध्ये महिला आर्थिक विकास महामंडळ द्वारा संचलित तेजस्विनी लोकसंचलित साधन केंद्र परतुर अंतर्गत १ कोटी रुपये तर मातोश्री रमाई लोकसंचलित साधन केंद्र तळणी अंतर्गत १ कोटी ५० लक्ष रुपये सह्याद्री लोकसंचालित साधन केंद्र मंठा अंतर्गत १ कोटी रुपये यांचा समावेश असून सावित्रीबाई फ ुले लोकसंचालित साधन केंद्र आष्टी अंतर्गत १ कोटी ५० लाख रुपये काही दिवसांपूर्वीच आष्टी येथे आयोजित कार्यक्रम ात वाटप करण्यात आले आहेत असे एकूण ५ कोटी रुपयांच्या धनादेशाचे वाटप लोणीकर यच्या हस्ते करण्यात येणार असल्याचे देखील प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

# घनसावंगी व्हाया जाफ्राबाद ड्रोनच्या घिरट्या जालना तालुक्यात...

## नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण; वंचितचे विजय लहाने यांनी घेतली पोलीस अधीक्षकांची भेट

जालना । प्रतिनिधी - रात्रीच्यावेळी ड्रोन कॅमेरे घिरट्या घालत असल्याची तक्रार दिवसेदिवस वाढत चालली असून सुरुवातील घनसावंगी तालुक्यातील गावकऱ्यांनी याबाबत तक्रार केली होती. त्यानंतर नुकतेच जाफ्राबाद तालुक्यातून ड्रोन कॅमेऱ्याच्या घिरट्यांनी गावकऱ्यांम ध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. शुक्रवार (दि २७) च्या मध्यरात्री जालना तालुक्यातील काही भागात ड्रोन दिसल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. घनसावंगी व्हाया जाफ्राबाद ड्रोनच्य घिरट्या जालना तालुक्यात आल्या आहेत. याची आता पोलीस प्रशासनाने गांभीर्याने दखल घेऊन घडणाऱ्या या घटनेमागे नेमके कारण काय आहे? याचा उलगडा करणे आवश्यक आहे.

तालुक्यातील कडवंची, नंदापुर, वखारी, धारकल्याण या परिसरामध्ये शुक्रवार (दि. २७) रोजी मध्यरात्रीच्या सुमारास दोन ड्रोन कॅमेऱ्यांनी घिरट्या घातल्याने नागरिकांमध्ये संभ्रमाचे तसेच भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. यासंदर्भात वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी विजय लहाने यांनी तातडीने डीवायएसपी कुलकर्णी यांना फोनवरून याची माहिती दिली होती. परंतु कोणीही पोलीस कर्मचारी यांनी घटनास्थळी येऊन पाहणी केली नसल्याचा आरोप विजय लहाने यांनी केला. शनिवार (दि २८) रोजी दुपारी दीड वाजेच्या सुमारास विजय लहाने यांनी परिसरातील नागरिकांसह पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल यांची भेट घेऊन सदर घटनेबाबत सविस्तर माहिती दिली. या परिसरामध्ये



पोलिसांची गस्त वाढवण्याची म ागणी केली. विजय लहाने यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, जाफराबाद तालुक्यांमध्ये अशाच प्रकारे रात्रीच्या वेळी ड्रोन कॅमेरा फिरवून मोठ्या चोरीच्या घटना घडलेल्या आहेत. अशा प्रकारच्या घटना घडू नये म्हणून पोलीस प्रशासनाने तात्काळ उपाययोजना करव्यात अशी मागणी त्यांनी पोलीस प्रशासनाकडे केली आहे


# पत्नी व मुलांना कोंडुन तरुणाची आत्महत्त्या

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील यशोदीपनगर भागातील सुरेश रामराव जायभाये (वय ४०) या तरुणाने पत्नी, दोन जुळ्या मुलांना बेडरूममध्ये कोंडून घराच्या जिन्यात असलेल्या झोक्याच्या दोरीला गळफास लावून आत्महत्या केली आहे. ही घटना शनिवार (दि २८) भल्या पहाटे अडीच वाजेच्या सुमारास घडली आहे. वाशीम जिल्ह्यातील बोरखेडी येथील रहिवासी असलेले सुरेश रामराव जायभाये हे जालना येथील एका खाजगी ट्रान्सपोर्ट कंपनीत चालक म्हणून नोकरी करीत होता. यशोदीपनगर त्याचे स्वतःचे घर होते. पोलीसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी जिल्हा सरकारी रुग्णालयात हलविला. दरम्यान, मृतदेह उत्तरीय तपासणीनंतर रुग्णवाहिकेतून मूळगावी नातेवाईकांसह रवाना करण्यात आला आहे.

# जाफाबाद भागातील जनतेने घेतली चोरांची धास्ती अशोक पाबळे

**जाफराबाद । प्रतिनिधी -** तालुक्यातील टेंभुर्णी सह परिसरात मागील काही दिवसापासून चोरट्यांचा शिरकाव वाढल्याने ग्रामीण जनतेत भीतीचे वातावरण पसरले आहे चोरट्यांकडून काही ठिकाणी शेतात काम करणाऱ्या महिलांचे दागिने हिसकावूनण्याचा प्रकार घडल्याने ऐन सुगीच्या काळात महिला शेतात जाण्यास घाबरत आहे दरम्यान चोरी प्रकरणातील एका चोरट्याला पकडण्यात ज्या जाफाबाद पोलिसांना यश आले असलेले तरीही इतर काही चोरटे पळून जाण्यात यशस्वी झाले त्यानंतरही तुरीचे प्रकार घडत असल्याने नागरिकांमध्ये घबराटीचे वातावरण पसरले आहे टेंभुर्णी परिसरातील बुटखेडा येथील रात्री तीन चार ठिकाणी चोरट्यांनी चोरीचा प्रयत्न केला त्यानंतर जाफाबाद तालुक्यातील कुंभारी या ठिकाणी एकाच रात्री दोन ठिकाणी एकाच रात्री दोन ठिकाणी घरफोडी झाली याशिवाय शुक्रवारी दुपारी शेतात काम करणाऱ्या एका महिलेच्या गळ्यातील सोन्याची पोत घटना सुरूच असल्याने ग्रामीण भागातील गावागावात सध्या चोरट्यांचा चर्चा सुरू आहे महिला व मजुर वर्गात सध्या. भीतीचे वातावरण आहे सध्या सोयाबीन सोंगणी सुरु असताना चोरट्यांच्यां भीतीनेमुळे अनेक महिला शेतात जाण्यास घाबरत आहेत हे चोरटे दिवसा गावातील काहीतरी विकण्याच्या बाहाण्याने येऊन रेकी करत असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे यामूळे गावात येणाऱ्या अशा प्रत्येक नवख्या व्यक्तीवर गावकरी बारकाईने लक्ष ठेवून आहेत पोलिसांनी या चोरट्यांचा त्वरित बंदोबस्त करावा कशी मागणी जनतेतून होत आहे दरम्यान गावागावांत ग्रामसुरक्षा दल स्थापन करून सुरक्षिततेची काळजी घ्यावी असाही सुर निघत आहे

नागरिकांनी अफवा विश्वास ठेवू नये सध्या परिसरात चोरट्यांची चर्चा सुरू असल्यातरी नागरिकांनी न घाबरता दक्ष राहावे कोणी संशयित आढळल्यास त्वरित ११२ वर या क्रमांकावर पोलिसांशी संपर्क करावा केवळ संशयावरून कोणालाही मारहाण करू नये नवीन विक्रेते गावात असल्यास त्यांना आधार कार्ड व इतर माहिती मागून त्यांचे फोटो काढून ठेवावे पोलिसां तर्फे सर्व काळजी घेतली जात आहे ते मुरली पोलिसांच्या दोन गाड्या दररोज रात्री पेट्रोलिंग करीत आहे अनेक ग्रामपंचायतीने सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यासाठी पुढाकार घेत आहे नागरिकांनी अफेवर विश्वास ठेवू नये असे आवाहन सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन खामगळ केले आहे.








हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.